# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 17 October 2026

## Time 7.10 to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- जनगणनेसंबंधी सुधारित नियम लागू-शैक्षणिक संस्था, बँक तसंच विश्वस्त मंडळातल्या सर्वांचा प्रगणक यादीत समावेश
- भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे लोकशाही बळकट-मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्याकडून छत्रपती संभाजीनगर तसंच जालना जिल्ह्यात दुष्काळ पाहणी

आणि

- भारताच्या महिला क्रिकेट संघाचा झिम्बॉब्वेवर ४ विकेटने विजय-पुरुष संघाचा वेस्टइंडीज सोबत आज अंतिम सामना

****

गृह मंत्रालयानं जनगणना कायदा १९४८ अंतर्गत दुरुस्ती नियम, २०२६ लागू केले आहेत. याबाबत मंत्रालयानं काल अधिसूचना जारी केली. या सुधारणेद्वारे जनगणना करण्यासाठी पात्र व्यक्तींची यादी वाढवली आहे. त्यानुसार, सरकारी, स्थानिक प्राधिकरण, अनुदानित आणि विनाअनुदानित खाजगी शैक्षणिक संस्थांमधले शिक्षक, तसंच संस्था किंवा ट्रस्टद्वारे चालवल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्थांमधल्या शिक्षकांची नियुक्ती जनगणना कर्मचारी म्हणून केली जाऊ शकते.

या सुधारणेत केंद्र आणि राज्य सरकारं, स्थानिक प्राधिकरणं, तसंच विविध आस्थापनांमध्ये कार्यरत असलेले लिपिक आणि इतर अधिकाऱ्यांचाही प्रगणक यादीत समावेश करण्यात आला असून, सार्वजनिक क्षेत्रातले उपक्रम, वैधानिक

संस्था, बँका, कंपन्या, विविध संस्था, सोसायट्या आणि ट्रस्ट यांचाही यामध्ये समावेश आहे.

****

कॉक्रोच जनता पार्टीचे नेते अभिजीत दिपके तसंच नेहा बोरा यांना काल दिल्लीतल्या त्यांच्या निवासस्थानावरून पोलिसांनी ताब्यात घेतलं. दिल्लीतील कॅनॉट प्लेस इथे पक्षाच्या प्रस्तावित ‘लहरा दो तिरंगा’ या आंदोलनात सहभागी होण्यासाठी ते घराबाहेर पडत असताना ही कारवाई करण्यात आली.

****

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळे भारतीय लोकशाही बळकट असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. मुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनमूल्यांवर आधारित ‘स्मार्ट नागरिक’ अभ्यासक्रमाचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल झाला, त्यावेळी ते बोलत होते. निवृत्त सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. भारतात सरकार बदलाची घडामोड ही फक्त संसदेतच आणि संवैधानिक पद्धतीनेच होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. ते म्हणाले…

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी राज्य सरकारच्या सेवेतल्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं १ दिवसाचं वेतन मुख्यमंत्री सहायता निधीत जमा केलं जाणार आहे. ऑक्टोबरच्या महिन्याच्या वेतनातून ही कपात होणार आहे.

****

दुष्काळी पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील शेतकऱ्यांना वेळेत मदत देण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचं, केंद्रीय सामाजिक न्याय आणि अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले यांनी म्हटलं आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील आडगाव सरक इथे दुष्काळी शेतीची पाहणी केल्यानंतर बोलत होते. आठवले यांनी काल जालना जिल्ह्यातल्या बदनापूर तालुक्यातल्या देवगाव इथंही शेतपिकांची पाहणी केली. आज ते लातूर जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीची पाहणी करणार आहेत.

****

जालना जिल्ह्यात पिण्याचं पाणी, जनावरांसाठी चारा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी नियोजन करण्याचे निर्देश जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिले आहेत. त्या काल विभागप्रमुखांच्या बैठकीत दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर बोलत होत्या. दरम्यान, अंतरवाली सराटी गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी हे गाव आपण दत्तक घेत असून, पुढील महिन्यात गावाला भेट देणार असल्याचंही पंकजा मुंडे यांनी सांगितलं.

****

दुष्काळ सदृश्य परिस्थितीमुळे ग्रामपंचायतींना पाणीटंचाई, चारा आणि शाळेतील सुविधांवर खर्च करावा लागणार असल्याच्या सूचना छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जी श्रीकांत यांनी दिल्या आहेत. ते काल परभणी इथे आढावा बैठकीत ते बोलत होते. दरम्यान, परभणी तालुक्यात टाकळी कुंभकर्ण इथं आयुक्तांनी पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांची चौकशी करत त्यांना दिलासा दिला.

नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना मुख्यालयी उपस्थित राहणं बंधनकारक करण्यात आलं आहे. पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडल्यास शिस्तभंगाच्या कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

****

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत मतदार यादीत नाव नोंदवण्यासाठी तसंच दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यातील सर्व मतदान केंद्रांवर आज आणि उद्या तसंच २४ आणि २५ ऑक्टोबर २०२६ या सुट्टीच्या दिवशी विशेष मतदार नोंदणी शिबिरांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनाचा २५ वर्षांचा प्रवास 'जनसेवा से देशसेवा' या मंत्राने प्रेरित असून, सेवा आणि सुशासनाच्या दृष्टिकोनातून २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सरकार कार्यरत आहे. सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तनाचा प्रयत्न या कार्यातून होत आहे. याच उद्देशानं केंद्र सरकारनं डिजिटल पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला आहे. आज या संदर्भात जाणून घेऊ,

**नागरिकांना सरकारी सेवा सुलभ, जलद आणि पारदर्शक पद्धतीनं उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं केंद्र सरकारनं डिजिटल पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा म्हणजे नागरिक, उद्योग आणि सरकारी संस्थांना डिजिटल माध्यमातून सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेली मूलभूत डिजिटल व्यवस्था. डिजिटल ओळख, ऑनलाइन आर्थिक व्यवहार, कागदपत्रांचे डिजिटल संग्रहण आणि माहितीची सुरक्षित देवाणघेवाण या सुविधांचा यात समावेश आहे.**

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

**डिजीटल पायभूत सुविधांमुळं नागरिकांना अनेक सेवा घरबसल्या मिळण्याची संधी उपलब्ध झाली आहे.**

****

युवक महोत्सव हा विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देणारा आणि व्यक्तिमत्त्व विकासाला नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण मंच असल्याचं, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी म्हटलं आहे. काल नांदेड इथे आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव 'ज्ञानतीर्थ २०२६ च्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. प्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुरे यावेळी उपस्थित होते. जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

****

सहकार क्षेत्रातील निवडणुका पक्षीय पातळीवर होत नाहीत, मात्र जिथे पक्षीय पातळीवर निवडणुका होतील, तिथे महायुती म्हणून आम्ही एकत्र राहू, अशी भूमिका सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी मांडली आहे. लातूर इथे जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते काल बोलत होते. बाबासाहेब पाटील यांचे बंधू अविनाश जाधव यांचा उमेदवारी अर्जही यावेळी दाखल करण्यात आला. काँग्रेसचे माजी आमदार धीरज देशमुख यावेळी उपस्थित होते.

****

शारदीय नवरात्र महोत्सवात काल सहाव्या माळेनिमित्त, तुळजापूर इथं श्री तुळजाभवानी देवीची मुरली अलंकार महापूजा मांडण्यात आली. शेकडो भाविकांनी देवीच्या या रुपाचं दर्शन घेण्यासाठी गर्दी केली.

****

परभणी इथं काल जिल्ह्यातील ५२ ऐतिहासिक वारसा स्थळांची माहिती देणारं प्रदर्शन भरवण्यात आलं होतं. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या हस्ते या प्रदर्शनाचं उद्घाटन करण्यात आलं. या अनुषंगाने घेण्यात आलेल्या कार्यशाळेत सहभागी प्रशिक्षणार्थींना आयुक्तांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्रही प्रदान करण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आरोग्य आणि शिक्षण विभागाच्या वतीने नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर किशोरवयीन मुलींसाठी विशेष समुपदेशन आणि जनजागृती कार्यक्रम काल घेण्यात आला. या कार्यक्रमात मनपा शाळांमधील सातवी ते दहावीच्या सुमारे ७७० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

***म

भारताच्या महिला क्रिकेट संघाने काल झिम्बॉब्वेचा ४ विकेटने पराभव केला. रायपूर इथे झालेल्या सामन्यात झिंबॉब्वेने प्रथम फलंदाजी करत पाच बाद ११४ धावा केल्या. भारताने हे लक्ष्य ६ विकेट गमावत १५ षटकं आणि ४ चेंडूत साध्य केलं. मालिकेत दुसरा आणि तिसरा सामना अनुक्रमे १८ आणि २० ऑक्टोबरला होणार आहे.

भारत आणि वेस्टइंडीज पुरुष संघात टी २० मालिकेतला पाचवा आणि अंतिम सामना आज बेंगलुरु इथे होणार आहे. या मालिकेत प्रत्येकी २ सामने जिंकून दोन्ही संघ बरोबरीत आहेत.

****